पुण्यनगरी दि. १४।११।२०२३

# 'विवेकानंद' टेबल टेनिस स्पर्धेत अजिंक्य

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या संघाने डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कसबा बावडा या संघाचा पराभव करून अजिंक्यपद संपादन केले. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे या स्पर्धा घेण्यात आल्या. विवेकानंद कॉलेजच्या संघातील ऋषीकेश नलवडे, भव्य शहा, अनिष सोनटक्के व साहिल शिपूरकर या खेळाडूंनी चांगली कामगिरी करून हे यश मिळवले. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी त्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखानाप्रमुख प्रा. हवलदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे प्रोत्साहन मिळाले. Pn.12.11

1.2023

पुढारी दि. 12/11/2023.

# 'विवेकानंद'च्या प्रेमराज पाटीलची राष्ट्रीय गिर्यारोहण शिबिरासाठी निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील एनसीसीचा विद्यार्थी प्रेमराज पाटील याची ग्वाल्हेर येथे होणाऱ्या राष्ट्रीय गिर्यारोहण शिबिरासाठी निवड झाली. हे राष्ट्रीय शिबिर १५ दिवसांचे असून गिर्यारोहणासाठी आवश्यक खडतर प्रशिक्षण राष्ट्रीय छात्र सेना मध्य प्रदेश, छत्तीसगड विभागामार्फत दिले जाणार आहे. शारीरिक व मानसिक सुदृढतेच्या वेगवेगळ्या चाचण्यांमधून विद्यार्थ्यांची निवड एनसीसीमार्फत झाली आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले, पाच महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे सुभेदार मेजर सुरेश भोसले, ट्रेनिंग जेसीओ प्रशांत चमनिक, सुभेदार राजाराम आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. 12-11-203